# मुंबई विद्यापीठ

## उमेदवारांसाठी सुचना

(१) मतदान केंद्रावर प्रतिनिधींची नेमणूक करण्यासाठी उमेदवाराने **कुलसचिव-तथा निवडणुक निर्णय अधिकारी** यांना मतदानाच्या ६ दिवस अगोदर **दोन फोटोसह** नमुना (अ) मध्ये अर्ज सादर करावा लागेल.

(२) प्रत्येक मतदान प्रतिनिधीला नमुना (ब) प्रमाणे ओळखपत्र देण्यात येईल.

(३) मतदान केंद्राच्या परिसरापासुन १०० मीटर अंतराच्या आत कोणत्याही संस्था/उमेदवार/प्रतिनिधी इत्यादींना मतदान केंद्रावर कोणत्याही प्रकारची भिंती पत्रके, झेंडे अथवा बॅनर्स मतदानाच्या आदल्या दिवशी व मतदानाच्या दिवशी लावण्यास बंदी असेल. विद्यापीठ निवडणूक विभागाच्या निवडणुकीसंबधीत वाहनाव्यतीरिक्त अन्य कोणत्याही वाहनास मतदान केंद्राच्या परिसरात प्रवेश करता येणार नाही.

(४) मतदान केंद्राच्या परिसरात फक्त उमेदवार व त्यांचे अधिकृत प्रतिनिधी, मतदार आणि निवडणुकसंबधी कर्मचारी/अधिकारी यांनाच प्रवेश असेल.

(५) बोगस मतदार आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(६) सुचनांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(७) मतदार केंद्रावर निवडणूकीसंबधी कोणताही वाद निर्माण झाल्यास निवडणूक अधिकारी परिनियम व कायद्याच्या आधारे कुलसचिव-तथा-निवडणूक निर्णय अधिकारी आणि कुलगुरुंच्या सल्ल्याने योग्य तो निर्णय घेण्यास सक्षम असेल.

(८) मतपत्रिकेवरील उमेदवारांची क्रमवारी मराठी अक्षराप्रमाणे असेल व मतपत्रिकेवर इंगजी आणि मराठीमध्ये नावे असतील.

* * * * *

Scanned by CamScanner